# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 05/03/2021 (शुक्रवार)

(दुपार)

---

### जबरी संभोग

पो.स्टे. कोंढाळी :– दि. 03/03/2021 चे 11.00 वा. ते 11.15 वा. फिर्यादी यांची 10 वर्षीय पिडीत मुलगी हिला यातील आरोपी नामे– प्रशांत बाळकृष्ण गजभिये, वय 20 वर्ष, रा. रिंगनाबोळी, ता. काटोल जि. नागपूर याने तिला पैसे देवुन ब्लेड आणायला पाठविले. पीडितेने ब्लेड आणल्यावर आरोपीने तिला त्याच्या घरी बोलावले नेहमीप्रमाने ती त्याच्या घरी गेली तेव्हा घरी कोणीही नाही अशी वेळ साधुन आरोपीने एकांताचा फायदा घेत त्याने पीडित मुलगी हिच्या सोबत बळजबरीने लैंगीक अत्याचार केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम 354 ब, 376 (2)(फ), 376(2)(5), 376(अ)(ब) भादंवि. सहकलम 4,6,8 बाल लैंगीक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री. विश्वास पुल्लवर 9130149548 हे करीत आहे.

### अपघातात मृत्यु

1) पो.स्टे. मौदा :– अंतर्गत महालगाव शिवार येथे फिर्यादी नामे– धनराज वसंत राउत, वय 40 वर्ष, रा. कढोली हा ऑरेज सिटी प्लावुड कंपनी महालगाव येथे 10 वर्षा पासून काम करतात. फिर्यादी सोबत राम अशिष चंद्रदेव भारदाज(मृतक) वय 44 वर्ष जि. बलिया यूपी ह.मू.ऑरेज सिटि हे 10 वर्षा पासून हा काम करीत आहे. दि. 03/03/21 चे 20.30 वा दरम्यान फिर्यादी व क्रिष्णकुमार गजानन भूसे असे दोघेही कंपनीमध्ये हजर असतांना कंपनीच्या समोरील एनएच. 53 नागपूर ते भंडारा रोडवर राम अशिष भारदार हा पारधी पेट्रोलपंप जवळील धाब्यावरुन जेवन करुन पायदळ ऑरेंज सिटि कंपनीकडे येत असता महालगाव शिवार एन.एच 53 नागपूर वरुन भंडारा कडे जाणाऱ्या रोडवर ट्रक क्र एम.एच– 49/एटि–7191 चे चालक आरोपीने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून पायदळ रोड क्रास करणारा राम अशिष चंद्रदेव भारदाज यांना धडक मारल्याने अपघातात ते गंभीर जखमी होवून जागीच मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री मोहोड मो. न. 9823910156 हे करीत आहे.

2) पो.स्टे. कुही :– अंतर्गत 7 कि. मी. चिपडी येथे आरोपी/ मृतक नामे– विलास मधुकर कांबळे, वय 35 वर्ष, रा. कैलास नगर मातामंदीर जवळ अर्पाटमेंट नागपूर हा दि. 05/02/2021 रोजी मांढळ वरून नागपुर कडे 17.30 वा. सुमारास हा त्याचे एमएच– 49/एजी– 7570 क्रमांकाच्या मोटरसायकल जात असता चिपडी गावा समोरील रोडवर डुक्कर अचानक आडवा आल्याने त्याचा बाईक वरून तोल सुटल्याने वाहन अंनियत्रीत होवुन अपघात झाला. या अपघातात गाडीवर त्याचा मित्र राकेश तबाने (पटवारी) हा पाठीमागे बसला होता. तो किरकोळ जखमी झाला तर मोटरसायकल चालक विलास कांबळे हा गंभीर जखंमी झाला. त्यास उपचाराकामी प्राथम सेंट्रल इंडीया कारडीयोलोजी इंस्टीस्टयुट सावरकर नगर नागपुर व दि. 24/02/2021 पर्यंत उपचारा करून त्याची प्रकृती दुरूस्त न झाल्याने दि. 24/02/2021 रोजी 20.49 वा. ऑरेज सिटी हॉस्पीटल येथे रेफर केले. त्याचा उपचार चालु असतानी दि. 26/02/2021 ला संध्याकाळी 06.12 वा. डॉक्टरानी तपासुन मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कुही येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि तकीत मो.न. 8766964595 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर